# प्रकरण सातवे

# उपसंहार

## प्रकरण सातवे

## उपसंहार

मराठी साहित्याचा समुद्र दिवसेंदिवस अधिकच वाढतो आहे. त्याला कथा, काव्य, नाटक, चरित्र, आत्मचरित्र, प्रवासवर्णन या वाड्.मयप्रकारांच्या नद्या येऊन मिळताहेत आणि यामुळे मराठी साहित्य जोमाने वाढते आहे, फोफावते आहे.

'कथा' ही लघुकथा आणि दिर्घकथाही असू शकते. 'कविता' ही सुध्दा लघुकविता आणि दिर्घकविता असते. 'नाटक' मात्र कलाकार, दिग्दर्शक आणि प्रेक्षक याद्वारे ते परिपूर्ण होऊन रसिक वाचकांपर्यंत पोहचत असते. 'आत्मचरित्र' हा एक विशिष्ट असा वाड्.मयप्रकार आहे. जुन्या स्मृतींना उजाळा देऊन त्या काळच्या युगधर्माचा इतिहासाचा, सामाजिक स्थितीचा आढावा घेऊन पूर्वीच्या आपल्याच जीवनाचा पुन्हा नव्याने शोध या आत्मचरित्रातून व्यक्त केला जातो. 'प्रवासवर्णन' हे आपण न पाहिलेली ठिकाणेसुध्दा डोळयासमोर उभी करून वाचकाला आपल्या निसर्गसौंदर्याने परिपूर्ण असे दर्शन घडवित असतात. या सर्व साहित्यप्रकारांपेक्षा "कादंबरी" हा वाड्.मयप्रकार विशेष आणि लोकप्रिय असा आहे.

बाणभट्टाच्या कपोलकल्पीत कथेपासून सुमारे 19 व्या शतकात उदयाला आलेली "कादंबरी" अल्पावधीतचे समाजमान्यता मिळवून लोकप्रिय बनली, कादंबरीचा पट हा अनेक संघर्षांनी, घटना–प्रसंग आणि व्यक्तिचित्रणांनी परिपूर्ण होत असतो. "कादंबरी" ही रोचक आणि आकर्षक वाड्.मयीन कलाकृती असते.

"कादंबरी" ही सामाजिक, ऐतिहासिक, अद्‌भूतरम्य, राजकीय इ. सर्व थरांतून लिहिली जाते. या कादंबरीचा आवाका विस्तृत स्वरूपात असतो. साधारण एकोणिसाव्या शतकात जन्माला आलेली कादंबरी आपल्या शतकोत्तर कालखंडातील एवढयाशा अल्पकाळात सर्वसामान्यांपासून असामान्य अशा सर्वच लोकांपर्यंत जाऊन पोहचली व लोकमान्यता पावली. मराठी साहित्यात

"कादंबरी" या वाड्.मयप्रकाराला विशेष असे महत्व आहे.

मराठी साहित्यात "ग्रामीण" आणि "दलित" हे उपविभाग विसाव्या शतकात उदयाला आले आणि या कादंबरीने "ग्रामीण" आणि "दलित" साहित्यात आपला प्रांत व्यापून टाकला. मराठी साहित्यात प्रचंड प्रमाणात कादंबरी निर्माण झाली, निर्माण होत आहे व यापुढेही ती भरपूर प्रमाणात निर्माण होत राहणार आहे असे म्हटल्यास वावगे ठरू नये.

ग्रामीण साहित्यातून दलित साहित्याचा उदय झाल्याने पूर्वाश्रमीच्या ग्रामीण साहित्यिकांचा साज आणि बाज घेऊन स्वातंत्र्यपूर्वकालखंडात आणि स्वातंत्र्योत्तर काळातही नवोदित साहित्यिकांनी "कादंबरी" ह्या वाड्.मयप्रकारावर विशेष असा भर दिलेला आपणास दिसून येतो.

साधारण इ.स.1960 च्या पुढे जे खऱ्या अर्थाने सकस असे स्वतंत्र "दलित साहित्य" उदयाला आले. या साहित्यात सुरूवतीच्या कालखंडात 'आत्मचरित्रे', 'आत्मकथने,' 'कविता' हे वाड्.मयप्रकार भरभरून वाहू लागले, ताकतीने व जोमाने दलित साहित्यात उदयाला आले त्याप्रमाणात "कादंबरी", "नाटक" इ. वाड्.मयप्रकार मात्र भरीव स्वरूपात लिहिले गेले नाहीत. ही दलितेतरांची टिपणी काही अंशी जरी सत्य असली तरी अण्णा भाऊ साठे, शंकरराव खरात, शंकर भाऊ साठे या मंडळींनी या टिप्पणीला आपल्या कादंबरी लेखनाने चोख उत्तर दिलेले आहे.

'फकिरा', 'वैजयंता', 'आवडी', 'वैर', 'पाझर', 'चिखलातील कमळ', 'चित्रा', 'रूपा' यांसारख्या एकापेक्षा एक अशा सुमारे पस्तीसच्या वर अण्णा भाऊ साठे यांनी कादंबऱ्या लिहिल्या आणि विशेष असे की अण्णा भाऊ साठे हे जेव्हा 'दलित कादंबरी' लिहित होते तेव्हा "दलित साहित्य" हा शब्दप्रयोगही अस्तित्वात आलेला नव्हता. अण्णा भाऊ साठे यांनी इतर वाड्.मयप्रकारापेक्षा "कादंबरी" हाच वाड्.मयप्रकार अधिक प्रमाणात हाताळला आणि साहित्यक्षेत्रात आपले नाव अजरामर केले. 'वाटेगाव' ते 'मॉस्को' असा त्यांनी व त्यांच्या कादंबऱ्यांनी प्रवास केला हे जगजाहीरच आहे. साधारण इ.स.1936 ते इ.स.1969 असा अण्णा भाऊ साठे यांचा साहित्यिक कालखंड होता.

दि.18 जुलै 1969 ला अण्णा भाऊंचा मृत्यू झाला आणि काही कालावधीनंतर अण्णा भाऊंच्या पश्चात शंकर भाऊ साठे या त्यांच्या कनिष्ठ बंधूंनी आपल्या जेष्ठ बंधूंच्या आठवणी "माझा भाऊ अण्णा भाऊ" या आत्मचरित्रात्मक पुस्तकाद्वारे प्रकाशित केल्या आणि अण्णा भाऊंचाच पेन घेऊन ह्या आठवणी लिहून काढणारे शंकर भाऊ साठे हे साहित्यिक म्हणून मराठी साहित्य शारदेच्या दरबारात हजर झाले.

अण्णा भाऊंच्या ह्या आठवणीनंतर शंकर भाऊ साठे यांनी आपल्या जेष्ठ बंधूंचा साहित्यिक वारसा चालविण्याच्या हेतूनेच गावकुसाबाहेरील दलित, बहुजनवर्गाचे वास्तव जीवनदर्शन मराठी वाचकांना घडविण्यासाठी कादंबरी लिखाणास सुरूवात केली. "एकच काडतूस", "सावळा", "घमांडी", "सूड", "जग", "काळा ओढा", "बाजी", "हंबीरा", "सुगंधा", "सगुणा", "बायडी" यासारख्या सुमारे पंधरा कादंबऱ्या शंकर भाऊंनी लिहिल्या. त्यापैकी सुमारे बारा कादंबऱ्या प्रकाशित असून तीन कादंबऱ्या ह्या अप्रकाशीत स्वरूपात आहेत.

इ.स.1980 ते इ.स.1996 या अवघ्या सोळा वर्षाच्या साहित्यलेखन कालखंडात शंकर भाऊ साठे यांनी सुमारे सोळा साहित्यकृती लिहिल्या. दलित, उपेक्षित, कष्टकरी, श्रमजीवी अशा समाजाचे चित्रण करणे हा शंकर भाऊंचा साहित्यिक पिंडच म्हणावा लागेल. मजूर आणि मालक हे त्यांच्या "कादंबरी"चे साहित्यिक बीज असून समाजव्यवस्थेच्या माथी खापर फोडून शंकर भाऊ आपल्या नायकांच्या जीवनचरित्राचे संघर्षमय दर्शन घडवितात.

शंकर भाऊ साठे यांच्या "सावळा" आणि "घमांडी" ह्या दोन कादंबऱ्या गावकुसाबाहेरील "मांग" समाजातील नायकांच्यावर आधारीत असून "मांग" समाजाची तत्कालीन स्थिती व रूढी, प्रथा, परंपरा, चालीरीती, अंधःश्रध्दा या सोबतच करारी, धाडसी आणि वीर पुरूषांची जीवनकहाणी शंकरभाऊ साठे यांनी या कादंबऱ्याद्वारे मांडलेली आहे. 'न्यायप्रिय', 'चारित्र्यसंपन्न', 'धाडसी' असे शंकरभाऊंचे नायक असून "सौंदर्य" आणि "शिल" हेच आपले सर्वस्व असे मानणाऱ्या चारित्र्यसंपन्न 'पतिव्रता' ह्या शंकर भाऊंच्या कादंबऱ्यातील नायिका आहेत.

जो अंधारात होता त्याला प्रकाश मिळावा, जो उपेक्षित आहे त्याला सन्मान मिळावा, याच हेतूने शंकरभाऊंनी कादंबऱ्या लिहिल्या आणि गावकुसाबाहेरच्या दलित व बहुजन समाजाचे जीवन गावकुसाआतील श्रीमंत, बागायतदार यांच्या सहाय्याने आपल्या प्रतिभाशक्तीने मांडले.

शंकरभाऊंच्या कादंबऱ्या म्हणजे विसाव्या शतकाच्या सुरूवातीच्या कालखंडातील जीवंत वास्तव घटनांचे दर्शन होय. लहान-लहान वाक्ये, ग्रामीणत्वाचा आणि दलितत्वाचा सुरेख संगम असलेली वर्णनशैली, अस्सल वातावरणनिर्मिती आणि हृदयाचा ठाव घेणारी भाषाशैली, सर्वसामान्यांच्या व्यवहारातील म्हणींचा अधिक उचित वापर या गोष्टींचा सुकाळ म्हणजे शंकर भाऊंच्या कादंबऱ्या होत.

सुमारेइ.स.1890 ते इ.स.1930-40 या कालखंडात घडलेल्या सत्यघटनांवर आधारीत शंकरभाऊंच्या सर्वच कादंबऱ्या असून "सावळा" व "घमांडी" ह्या सामाजिक आणि वाङ्मयीनदृष्ट्या अतिशय सरस उच्च प्रतीच्या अशा ह्या कादंबऱ्या आहेत.

अल्पशिक्षित असूनही साहित्यलेखनाच्या अल्पकाळात प्रचंड प्रमाणात साहित्यनिर्मिती करणारे दलित समाजातील शंकर भाऊ साठे हे श्रेष्ठ दर्जाचे कादंबरीकार, एक जेष्ठ दलित साहित्यिक होते असे म्हणणे म्हणजेच त्यांच्या साहित्यिक गुणांची त्यांच्या साहित्याचा एक अभ्यासक म्हणून कदर करणे सुयोग्य ठरेल.